पूर्वा कृषिदूत
प्रबोधनातून परिवर्तन... मासिक

संस्थापक संपादक
डॉ. बी.बी. पवार

संपादक
डॉ. भास्कर गायकवाड

संपादन सहयोग
पराग वाड

चित्रांकन आणि मांडणी
कैलास भामरे

व्यवस्थापक - लेखा विभाग
राजेंद्र बागुल

सहकार्य
विजय पवार
संचालक, पूर्वा ॲग्रोटेक

सुहास कदम
संचालक, पूर्वा ॲग्रो मार्केटिंग

महेश पाटील
संचालक, पूर्वा केमटेक, खान्देश

विजय नाईकरे
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, पुणे

सचिन दिघे
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, संगमनेर

रईस इनामदार
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, कोपरगाव

नंदकिशोर चतरकर
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, विदर्भ

संजय पाटील
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, मराठवाडा

पूर्वा केमटेक प्रा.लि.,
एम ११३, एमआयडीसी अंबड,
नाशिक-४२२०१०
मो. ७४२००१४७८१
email:poorvakrushidoot@gmail.com

## संपादकीय

# कृषी व्यवसायाचे बदलते स्वरुप



डॉ. भास्कर गायकवाड
(संपादक : 'पूर्वा कृषिदूत')
मो. ९८२२५१९२६०
gaikwadbh@yahoo.com

- हरितक्रांतीमुळे उपासमारीला आळा बसला
- कृषिपूरक व्यवसायांकडे शेतकरी आकर्षित झाले
- समन्वित कृषिधोरण अंगिकारणे मात्र अनिवार्य
- शेतीचे शाश्वत तंत्रज्ञान सर्वत्र पोहोचवले पाहिजे
- पाण्याचा पर्याप्त वापर करण्याकडे कल असावा
- शेतमालाची विक्री, प्रक्रिया यांकरिता नियोजन हवे
- निर्मितीक्षम कृषी उद्योगाचे वेगळेपण ओळखावे
- मनुष्यबळ विकासाचे तत्त्व कृषिक्षेत्रातही अवलंबणे गरजेचे

विसाव्या शतकाचा पूर्वार्ध तसा कृषी विकासामध्ये शांतच गेला. परंतु पूर्वार्धामध्ये घडलेल्या अनेक घटनांमुळे उत्तरार्धात अनेक कृषिक्रांती झाल्या. त्यामध्ये प्रामुख्याने उल्लेख करता येईल हरितक्रांतीचा. हरितक्रांतीमुळे भारतामध्ये, किंबहुना जगामध्ये होणाऱ्या उपासमारीला आळा बसला. बरेचसे देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाले. हरितक्रांतीमुळे धान्य, फळे, भाजीपाला आणि इतर कृषी उत्पादनांमध्ये भरपूर वाढ झाली. शेती एक सांस्कृतिक नवनिर्मिती आहे, धंदा नसून धर्म आहे असे म्हणणारे शेतकरी शेती एक धंदा आहे; ज्याद्वारे आपणास आवश्यक असलेले सर्व काही शेतीमधून मिळवू शकतो अशा प्रकारची 'इंटेन्सिव्ह ॲग्रिकल्चर'ची संकल्पना पुढे आली. त्यामध्ये मग रासायनिक खते, रासायनिक कीटकनाशके, मोठमोठी औजारे, पाणी आणि संकरित वाण यांसारखी पंचतत्त्वे शेतकऱ्यांच्या मदतीला धावून आली. या सर्व पंचतत्त्वांचा मोठ्या प्रमाणात वापर करुन शेती उत्पादन वाढविण्याची स्पर्धा सुरु झाली आणि जास्त उत्पादन घेणाऱ्यांना मोठमोठी बक्षिसे देण्यात आली.

हरितक्रांतीनंतर मोठी क्रांती झाली दुग्धव्यवसायामध्ये. सत्तरच्या दशकानंतर दुग्धव्यवसायामध्येही चांगल्या प्रकारचे संशोधन, विस्तार आणि सेवा-सुविधा उपलब्ध झाल्यामुळे शेतकऱ्यांना दुग्धव्यवसाय जास्त किफायतशीर वाटू लागला. त्यासाठी नवीन संकरित गायी, त्यांच्यासाठी योग्य चारा, नवनवीन औषधे, खाद्य आणि दुग्धव्यवसायावर उभ्या राहिलेल्या मोठमोठ्या दुग्धव्यावसायिक संस्था यांमुळे या व्यवसायामध्ये मोठ्या प्रमाणात वृद्धी होत गेली. महाराष्ट्रही दुधाच्या क्रांतीमध्ये आघाडीवर राहिला. त्यानंतरचा काळ म्हणजे

१९९० चे दशक. यामध्ये महाराष्ट्रामध्ये फळपिकांमध्ये क्रांती झाली. मोठ्या प्रमाणात फळांचे अनुदान आणि विस्तार योजनांमुळे आज महाराष्ट्र फलोत्पादनामध्ये फारच पुढे निघून गेला. याच दरम्यान चौथी क्रांती सुरुच होती, ती म्हणजे मत्स्यव्यवसायाची.

## कृषी संशोधन आणि विस्तारकार्य सुरू

अशाप्रकारे महाराष्ट्र आणि देशामध्ये विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात कृषी आणि कृषिपूरक व्यवसायांमध्ये चार मोठ्या क्रांत्या झाल्या. त्यामुळे आज ग्रामीण भागातील शेतकरी काही प्रमाणात सुखी झाला असे आपण सर्व म्हणतो. शेतकऱ्यांना शेती व्यवसायामध्ये भरपूर पैसे मिळू लागले. त्यामुळे त्यांच्या गरजाही वाढल्या आणि या गरजा पूर्ण करण्यासाठी जास्तीचे उत्पादन घेण्याची धडपड सुरु झाली. त्यासाठी नवनवीन तंत्रज्ञानाची गरज भासू लागली. संशोधन करण्यासाठी मोठमोठ्या संशोधन संस्था उभ्या राहिल्या. झालेले संशोधन शेतकऱ्यापर्यंत पोहोचविण्यासाठी कृषी विस्तार यंत्रणा सुरु कराव्या लागल्या. म्हणजे आज शेती क्षेत्रामध्ये एक मोठे जाळे निर्माण झालेले आहे. या सर्व बाबी बघता विसाव्या शतकामध्ये कृषी आणि कृषिपूरक व्यवसायांमध्ये मोठी आघाडी घेतली, असे म्हटले तर वावगे होणार नाही.

मागील ५० वर्षांमध्ये कृषिक्षेत्रामध्ये जास्त प्रगती करण्यासाठी कृषिसंशोधक, विस्तारक, सरकार आणि शेतकरी यांनी मोठा ध्यास घेतला. त्यामुळे जे हाती लागेल त्याचा वापर करण्यास सुरुवात केली. त्यासाठी परदेश दौरे, परदेशी तंत्रज्ञान, प्रयोगशाळेत असंख्य प्रयोग, शेतावर प्रयोग, नवनवीन तंत्रज्ञान आणि त्यासाठी लागणाऱ्या निविष्ठा आयात करुन ते आपल्या शेतीमध्ये वापरण्याचा प्रयत्न सर्वांनीच केला. अर्थात यात फायद्याबरोबरच तोटाही होतो याकडे दुर्लक्ष झाले किंवा केले हे सांगणे कठीण आहे. त्यातल्या त्यात 'तुझे आहे तुजपाशी परि तू जागा चुकलाशी' याकडे काणाडोळा करण्याचा प्रयत्न झाला. त्यामुळे आपल्या तंत्रज्ञानापेक्षा बाहेरचे तंत्रज्ञान फारच श्रेष्ठ हीच भावना शेतीव्यवसायामध्ये रूढ झाली. परिणामी आपल्याकडील काही चांगले तंत्रज्ञान, बियाणे, पिके, वाण, जाती- प्रजाती, जैविक गुणधर्म, जैविक विविधता नष्ट झाली. अर्थात आपल्या पारंपरिक पध्दती, तंत्रज्ञान आणि उपलब्ध जाती-प्रजाती पिकांचा संग्रह करण्यास परदेशी शास्त्रज्ञांनीही मागील शतकामध्ये ध्यास घेतला आणि त्याचा फायदा त्यांना झाला. आज आपल्याच तंत्रज्ञानाचा, वस्तूंचा आणि रुढींचा ताबा त्यांच्याकडे गेल्यामुळे त्यांनीच उभ्या केलेल्या पेटंटसारख्या महाभयंकर भुताच्या विळख्यामध्ये आपल्याला अडकविण्याचा प्रयत्न करत आहेत आणि ते यशस्वीही होत आहेत.

## कृषी रसायनांचा घातक चक्रव्यूह!

शेती क्षेत्रामध्ये रासायनिक खते, कीटकनाशके यासारख्या बाहेरच्या निविष्ठा आणल्यामुळे आपला शेतकरी शेण-माती, काडी- कचरा ही राष्ट्रीय संपत्ती आहे, तिचा वापर न करणे म्हणजे संकट होय हे पूर्णपणे विसरला. त्यामुळे आज शेतकरी पूर्णपणे रसायनांच्या चक्रव्यूहामध्ये सापडल्यामुळे आज संकटात आहे. शेती उत्पादन काढण्याचा खर्च भरमसाठ वाढतो आणि त्यानुसार शेती उत्पादनाला भाव मिळत नाही म्हणून शेतकरी आंदोलने करतात. परंतु शेती उत्पादन खर्च कमी केला तर आहे त्याच भावामध्ये शेती परवडेल. शेती उत्पादन खर्च कमी करण्यासाठी उपलब्ध नैसर्गिक संपत्ती, काडीकचरा, जमीन आणि पाणी यांचा योग्य वापर करणे गरजेचे आहे. अर्थात आज झालेल्या चारही कृषी क्रांत्यांमुळे शेती व्यवसाय हा एकात्मिक न राहता स्वतंत्र झालेला आहे. शेतकऱ्यांकडे गायी नाहीत तर दुग्धव्यवसाय करणाऱ्यांकडे जमीन नाही. म्हणजेच या सर्व कृषी विकासामध्ये एकात्मिक पध्दतीचा वापर नसल्यामुळे आज शेती अशाश्वत होत आहे. कृषी विस्तार करतानाही आज प्रत्येक विभाग वेगळा असल्यामुळे त्याचा विस्तारही वेगवेगळ्या पध्दतीने होत गेला. कृषी संशोधन, विस्तार आणि शासकीय योजना राबविताना एकात्मिक शेती व्यवसाय यावर विशेष भर देण्यात आला नाही. शेतकरी हा एक समग्र घटक डोळ्यासमोर न ठेवता एक तंत्रज्ञान किंवा एक विषय यावर जास्त भर देण्यात आला. कृषी आणि कृषिपूरक व्यवसायांमध्ये उत्पादन वाढविण्याच्या बाबतीत आपण यशस्वी झालो परंतु आज शेतकऱ्यांसमोर शेतीमाल विक्रीविषयी अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. जास्त उत्पादन खर्च करुन शेतकरी जास्त उत्पादन काढतात. परंतु उत्पादनाला योग्य भाव न मिळाल्यामुळे आज शेतकरी शेतीपासून दूर जात आहे. त्यासाठी योग्य ती विक्री व्यवस्था करण्याची गरज निर्माण झालेली आहे. आजपर्यंत कृषी आणि कृषिपूरक व्यवसायांमधील संशोधन, विस्तार आणि विकासकामांतील नियोजनामध्ये शेतकऱ्यांना सामावून न घेतल्यामुळे त्यांच्या अडचणी आणि गरजांवर आधारित कार्यक्रम घेतला जात नाही. त्यामुळे मोठ्या प्रमाणात खर्च करुनही पाहिजे त्या प्रमाणात शेतकऱ्यांना फायदा होत नाही.

## आत्मचिंतन करण्याची गरज

कृषी शिक्षण, कृषी तंत्रनिर्मिती, कृषिपूरक व्यवसायासाठी आवश्यक असलेल्या कुशल मनुष्यबळ निर्मिती, कृषी क्षेत्रासाठी वित्तपुरवठा, विक्रीव्यवस्था, शेतीमालावर प्रक्रिया उद्योग उभारणी यासारख्या महत्त्वाच्या बाबींवर आजही कमी प्रमाणात लक्ष

केंद्रित केलेले आहे. म्हणजेच विसाव्या शतकात शेतीमधील अनेक क्रांत्यांबरोबरच अनेक प्रश्न, संकटे आणि समस्याही निर्माण झालेल्या आहेत. निर्माण झालेले प्रश्न आणि समस्यांचा विचार करुन बदलत्या परिस्थितीनुसार कृषी विकासाचा आराखडा तयार करण्याची गरज आहे. विसाव्या शतकातील गोड– कटू अनुभव पाठीशी घेऊन त्याबद्दल आत्मचिंतन करुन समस्या सोडविण्यासाठी, शाश्वत उत्पादन वाढविण्यासाठी एकात्मिक कृषी आणि कृषिपूरक व्यवसायाचा विकास करण्याचे धोरण ठरविणे गरजेचे आहे. यासाठी शास्त्रज्ञ, कृषिविस्तारक, शेतकरी आणि सरकारी यंत्रणा यांनी एकत्रित येऊन गरजेनुरुप कार्यक्रम हाती घेण्याची गरज आहे. कृषी आणि कृषिपूरक व्यवसायाचा एकात्मिक विकास करण्यासाठी काही महत्त्वाच्या बाबींवर लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. काही कटू अनुभवांना मूठमाती देऊन गोड अनुभवांना पाठबळ देण्याची गरज आहे. तसेच पारंपरिक ज्ञानाला नवीन तंत्रज्ञान आणि शास्त्राचा आधार देऊन शाश्वत स्वरुपाचे कृषितंत्रज्ञान शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देऊन आजचा शेतकरी, ग्रामीण युवक या शेतीकडे जास्तीत जास्त कसा आकर्षित होईल यावर संशोधन करण्याची गरज आहे. एकविसाव्या शतकातील महत्त्वाच्या ठरु शकणाऱ्या बाबीपैकी खालील काही मुद्दे किंवा योजनांवर विशेष भर देणे गरजेचे आहे.

**जैवतंत्रज्ञान**– जैवतंत्रज्ञानामुळे कृषिविकास मोठ्या प्रमाणात होईल यात शंका नाही. त्यामध्ये जैविक खते, ज्यामुळे रासायनिक खतांचा वापर कमी करता येईल. तसेच पीक संरक्षणासाठी जैविक कीटकनाशके वापरुन रासायनिक कीटकनाशकांचा वापर कमी करता येईल. कमी पाण्यात उत्पादन देणाऱ्या नवीन जातींची निर्मिती जैवतंत्रज्ञानामुळे करता येईल. म्हणजेच रासायनिक खते, कीटकनाशके आणि पाणी यांचा कमी प्रमाणात वापर केल्यास शेतकरी कमी खर्चात शेती करु शकतील की, जी शेती शाश्वत असेल, कमी खर्चाची असेल, पर्यावरणाला कोणत्याही प्रकारची इजा पोहोचविणारी नसेल, मनुष्याला सकस आणि निरोगी आहार देणारी असेल आणि शेती उत्पादन आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्पर्धा करणारे असेल. अशा शेतीच्या निर्मितीसाठी जैवतंत्रज्ञान महत्त्वाचे ठरेल. जैवतंत्रज्ञान हे एक जहाल हत्यार शास्त्रज्ञांच्या हातामध्ये दिलेले आहे. त्याचा उपयोग शेतीच्या कल्याणासाठी होईल याचाच जास्त विचार व्हावा.

## पारंपरिक तंत्रज्ञानाला आधुनिक तंत्रज्ञानाची सांगड

भारताला कृषी व्यवसायाचा मोठा इतिहास आहे. नवीनच शेती व्यवसायामध्ये प्रगती केलेल्या देशांचे अंधानुकरण भारतासारख्या देशातील शास्त्रज्ञांनी न करता आपल्याच देशातील पारंपरिक तंत्रज्ञानावर जास्तीत जास्त संशोधन करुन त्या तंत्रज्ञानाला आधुनिक तंत्रज्ञानाची सांगड घातली तर ते तंत्रज्ञान शाश्वत असेल. भारताला शाश्वत शेती व्यवसायाची हजारो वर्षांपूर्वीची परंपरा आहे म्हणून जैविक तंत्रज्ञानाबरोबरच इतरही अनेक प्रकारच्या तंत्रज्ञानाची आपल्या पूर्वजांच्या शेती परंपरा आणि व्यवस्था यांचा अभ्यास करुन सांगड घातली तर आपले तंत्रज्ञान मौल्यवान होईल. इतरही देश आपले शाश्वत कृषी तंत्रज्ञान त्यांच्या देशामध्ये आयात करतील. सेंद्रिय शेती, जैविक शेती, नैसर्गिक शेती यामध्येच जैविक तंत्रज्ञान लपलेले होते. परंतु हे सांगण्यासाठी आपल्याला परदेशी शास्त्रज्ञांची मदत घ्यावी लागली. म्हणजेच– तुझे आहे तुजपाशी परी तू जागा चुकलाशी'.

**एकात्मिक कृषी व्यवसाय**– कृषी व्यवसाय फक्त एक पीक पध्दती किंवा एक व्यवसाय पध्दती यावर चालत नसून एकात्मिक पध्दतीने कृषी व्यवसाय केला तर तो शाश्वत आणि किफायतशीर होऊ शकतो. त्यासाठी शेतकऱ्यांकडे विविध पिके, फळे, दुग्ध व्यवसाय या सर्व घटकांवर आधारित शेती पध्दती रुढ केली पाहिजे. कारण हे एक शेतीचे शाश्वत अर्थचक्र आहे. यावर विशेष संशोधन आणि विस्तार होण्याची गरज आहे. निसर्गामध्ये होणाऱ्या बदलांमुळे होणाऱ्या नुकसानीला सामोरे जाण्यासाठी एकात्मिक कृषी पध्दती कधीही फायदेशीर आणि शाश्वत असेल यात शंका नाही.

## सुनियोजित पाणी व्यवस्थापन

पाणी आणि शेती यावर जास्त काम करण्याची गरज आहे. शेतीसाठी पाणी कमी होत आहे आणि शेतीचे उत्पादन वाढविणे हे एक आव्हान पुढे उभे राहणार आहे. त्यासाठी कमी पाण्यात पीक उत्पादन घेण्यासाठी विविध तंत्रज्ञान, पिकांचे वाण, पीक पध्दती, जमिनीचे व्यवस्थापन आणि पिकांचे व्यवस्थापन यावर विशेष भर देण्याची गरज आहे. कमी पाण्यात पीक उत्पादन घेता येईल, असे कृषी तंत्रज्ञान तसेच कमी पाण्यात कृषिपूरक व्यवसाय करता येईल असा कृषी व्यवसाय करुन देण्याची गरज आहे. तसेच पाण्याच्या नियोजनावर मोठ्या प्रमाणात प्रबोधन आणि प्रसार करून ते शेतकरी आणि समाजाला पटवून सांगण्याची मोठी जबाबदारी या शतकामध्ये प्रत्येकावर राहणार आहे.

## उत्पादन खर्चात बचत गरजेची

उत्पादन खर्चात बचत करुन शेती उत्पादन काढणे ही महत्त्वाची बाब राहणार आहे. कारण परदेशी शेतीमालाबरोबर स्पर्धा करण्यासाठी आपल्या कृषिमालाची किंमत तशी माफक राहणे गरजेचे आहे. त्यासाठी मुख्यत: रासायनिक खते आणि कीटकनाशके यांसारख्या बाह्य निविष्ठांचा कमी वापर करुन शेतकरी या निविष्ठांबाबत स्वयंपूर्ण झाला पाहिजे. त्यासाठी सेंद्रिय

शेतीसारखी संकल्पना पुढे येणे गरजेचे आहे. तसेच शेतकऱ्यांकडे असलेल्या मौल्यवान बाबी म्हणजे शेण, काडी-कचरा, मल-मूत्र, माती यांचा चांगल्या पध्दतीने वापर करुन उत्पादन खर्चात बचत करता येईल. कमी रसायनांवर पिकविलेल्या शेतीमालाला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मागणी राहणार आहे. त्यामुळे जगातील बाजारपेठांत आपला शेतीमाल स्पर्धा करील. तसेच उत्पादन खर्चात बचत केल्यामुळे शेती व्यवसाय किफायतशीर होईल आणि शेती व्यवसाय किफायतशीर झाला तरच शेतकरी, ग्रामीण युवक शेती व्यवसायाकडे आकर्षित होईल. यामुळे शहरांकडे जाणारे ग्रामीण मनुष्यबळ आपण थांबवू शकतो. शाश्वत जीवनासाठी शाश्वत शेती आणि कमी खर्चाचीच शेती मदत करु शकते.

## शेतीमालाची विक्री व्यवस्था उभारावी

शेती उत्पादन वाढीबरोबरच शेती उत्पादन विक्रीचा मोठा प्रश्न सोडवावा लागणार आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना शेतीमालाच्या बाजारपेठेविषयीची माहिती आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे देणे गरजेचे आहे. ग्राहकांच्या मागणीनुसार आणि विकेल ते पिकविण्याचाच शेतीमाल यापुढे जास्त भावाने विकला जाईल. शेती विक्री व्यवस्था करण्यासाठी विविध संस्थांना सहाय्य देण्याची गरज आहे, ज्याद्वारे देशांतर्गत तसेच देशाबाहेर कृषिमाल पाठविणे सोपे जाईल. त्यासाठी विशेष योजना आखणे क्रमप्राप्त आहे. देशामध्ये कृषी उत्पादनावर प्रक्रिया करण्याचे उद्योग सुरु झाले पाहिजे. त्यामध्ये प्रामुख्याने फळे आणि भाजीपाला या नाशवंत शेतीमालावर प्रक्रिया करण्यासाठी मोठे प्रकल्प सुरु करण्याची गरज आहे. त्यासाठी शेतकऱ्यांच्या सामूहिक गटाला किंवा संस्थांना मोठ्या प्रमाणात अर्थसहाय्य दिले तर जास्तीच्या उत्पादनावर प्रक्रिया करुन शेतीमालाचा भाव स्थिर ठेवण्यास मदत होईल. तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भारतातील कृषिमालाचे महत्त्व टिकवण्यासाठी काही ठोस उपाययोजना राबविल्या पाहिजेत. अनैसर्गिक थंडपेयांपेक्षा देशी फळांचा रस कसा उत्कृष्ट आहे हे पटविण्यासाठी देशामध्ये विविध प्रसारमाध्यमांचा मोठ्या प्रमाणात वापर केला पाहिजे आणि त्याला सरकारी यंत्रणेतून मोठे पाठबळ मिळण्याची गरज आहे, त्यामुळे प्रक्रिया केलेली फळे देशामध्येही मोठ्या प्रमाणात खपतील.

## मानवी साधनसंपत्तीचा विकास

कृषी अन् कृषिपूरक व्यवसायाचा विकास करावयाचा झाल्यास मानवी साधनसंपत्तीचा विकास करणे गरजेचे आहे. आज इतर क्षेत्रांमध्ये अनेक यंत्रणांमार्फत मानवाचा बौध्दिक आणि शारीरिकदृष्ट्या विकास केला जातो परंतु कृषिक्षेत्रामध्ये याचे प्रमाण फारच कमी आहे. कृषिक्षेत्रामध्ये अनेक नैसर्गिक समस्यांना तोंड द्यावे लागते. तसेच भारतीय शेती हा जगातील सर्वात मोठा व्यवसाय आहे. त्यासाठी अनेक कुशल हातांची गरज आहे. शेती हा कारखानाच वेगळा आहे. इतर कारखान्यांमध्ये कच्च्या मालापासून पक्का माल तयार होतो. परंतु शेती व्यवसायामध्ये तर पूर्णत: नवनिर्मिती आहे. येथे नवीन जन्माला येणे किंवा उत्पादन होणे त्यासाठी निश्चितच कुशल हातांची, जास्त बुध्दी असणाऱ्या मानवाची, शिक्षित आणि बौध्दिक ज्ञान घेतलेल्या बुद्धिजनांची गरज आहे. शालेय शिक्षणापासूनच कृषीचा एक विषय बंधनकारक करण्याची गरज आहे. तसेच कृषिक्षेत्रामध्ये कार्य करणारा शास्त्रज्ञ कृषिविस्तारक, युवक- युवती, शेतकरी यांना समाजामध्ये इतरांसारखा मान देणे गरजेचे आहे. कारण ते इतरांचे पालन पोषन करणारे आहेत. शेती व्यवसायाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलणे गरजेचे आहे. हे सर्व झाले तरच येणारी पिढी या व्यवसायाकडे आपुलकीने बघेल अन्यथा ती इतर व्यवसायांकडेच आकृष्ट झाली तर शेती करणारे हात कमी होतील आणि आपल्यासारख्या कृषिप्रधान देशाला ही बाब परवडणारी नाही.

भविष्यकाळात शेती व्यवसायाला फार वाव आहे. अनेक समस्यांना सामोरे जाऊन तंत्रज्ञानाचा वापर बुद्धिजीवी शेतकरी समाजाने केला तरच उत्पादन मिळणार आहे. मिळालेल्या उत्पादनाला जास्तीचा बाजारभाव निश्चित मिळणार आहे. खुली जागतिक अर्थव्यवस्था, ग्राहकांच्या बदलत्या सवयी, वातावरणातील बदल आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा होत असलेला ऱ्हास याबरोबरच वाढत असलेली लोकसंख्या या सर्व बाबींचा विचार करता शेती व्यवसायामध्ये फार मोठ्या प्रमाणात परिवर्तन होणार आहे. या परिवर्तनातून शेतीला उच्च स्थान परत प्राप्त होणार आहे. असे झाल्यास शेतकऱ्यांना त्यांची पूर्वीची प्रतिष्ठा पुन्हा प्राप्त होईल यात शंकाच नाही. ■

हे मासिक मालक, मुद्रक, प्रकाशक **संजय भास्कर पवार** यांनी निर्मल ऑफसेट प्रा.लि., बी २७, एम.आय.डी.सी. माळेगाव, ता. सिन्नर, जि. नाशिक येथे छापून ४, मिथिला अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्राजवळ, दातेनगर, गंगापूर रोड, नाशिक- ४२२०१३ येथे प्रकाशित केले.

संपादक : **डॉ. भास्कर गायकवाड.**

* या अंकातील लेखांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.